५ ऑक्टोबर २०१८

## - अमृतबिन्दूपनिषत् -

मनो हि द्विविधं प्रोक्तं शुद्धं चाशुद्धमेव च।
अशुद्धं कामसङ्कल्पं शुद्धं कामविवर्जितम्॥१॥

मन हे वायुरूप आहे, चंचल आहे, ताब्यात ठेवायला कठीण आहे याविषयी आपण सर्व जाणतो. याच मनाच्या दोन अवस्था आहेत - शुद्ध व अशुद्ध। संकल्प / विकल्प करणे हा मनाचा चाळा आहे. हवे-नको च्या चक्रात ते अडकलेले असते. संकल्पातूनच काम उद्‌भवतो. आणि या कामसंकल्पामध्ये अडकलेले मन हे अशुद्ध मन आहे आणि याउलट कामनाविरहित किंवा कामाने जिथे प्रवेशच केला नाही ते मन शुद्ध समजले जाते. [हि-निश्चित Indeed]
संकल्पप्रभवान् कामान्

मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः।
बन्धाय विषयासक्तं मुक्त्यै निर्विषयं स्मृतम्॥२॥

बंधन म्हणजे नुसते बांधणे नव्हे. तर बंधन म्हणजे नैराश्य, वैफल्य, क्षोभ, संताप, संसार व तणावयुक्त मन आहे. ही सर्व दुःखे मनातूनच निर्माण होतात आणि श्रुतींनी मनाची उत्कृष्ट मीमांसा केली आहे. Analysis. सर्व दुःखांचे मूळ मनच आहे. Mind is a blessing as well as curse! माणसाला दोन मने नसतात तर दोन प्रकारच्या वृत्ती असतात. त्या जन्मापासूनच असतात. Instinctive pattern घेऊन, संस्कारांचे गाठोडे घेऊनच आम्ही जन्माला येतो. वृक्षाचे मूळ कारण जसे त्याचे बीज असते तसेच आपल्या Sub conscious मनात ते बीज साठवलेले असते. वृत्तीरूपाने तेच सूक्ष्म संस्कार मनाच्या पृष्ठभागावर येतात. त्यासाठी निमित्त हवे.

Priority



8 am
यतो निर्विषयस्यास्य मनसो मुक्तिरिष्यते ।
अतो निर्विषयं नित्यं मनः कार्यं मुमुक्षुणा ॥३॥

9 10 11 12 1 pm

खरेखर ज्या मुमुक्षुला या मनाला मुक्त करण्याची इच्छा असेल त्याने प्रथम आपले मन निर्विषय करावे. परंतु तीच तर कठीण गोष्ट आहे. त्रिगुणात्मक प्रकृतिमध्ये मनाचा अंतर्भाव आहेच. तमोगुण अज्ञानाच्या आवरणाने आत्मप्रकाश झाकून टाकतो. अविवेक वाढवतो. बुद्धीमध्ये मोह-निद्रा, आळस्य, प्रमाद यातून निष्क्रियता! रजोगुण-रंजनात्मक, रिझवणाऱ्या विषयांच्या मागे जातो. उपभोग घेण्यासाठी प्रवृत्त करतो. परंतु मनात सतत उठणाऱ्या कामनांमुळे अतृप्ती वाढतच जाते. मात्र सत्वगुण ज्ञानाचा प्रकाश पसरवते.

2
निरस्तविषयासङ्गं संनिरुद्धं मनो हृदि ।
यदा यात्यात्मनोऽभावं तदा तत्परमं पदम् ॥४॥

3 4 5 6 7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraguruper.com